**"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती" आणि "ग्राम सामाजिक लेखापरीक्षण समिती"** या ग्रामस्तरावर गठित झालेल्या समित्यांची क्षमता बांधणी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्रमांक ग्रापापु-१००७ /प्र.क्र.१४१/ पापु-०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२, दिनांक : २ जूलै, २००७**

3UPI3

**वाचा:** १) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१०९९/प्र.क्र.३२८/पापु-०७, दिनांक २७ जुलै, २०००
२) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१००१/प्र.क्र.१९०/पापु-०७, दिनांक ३ सप्टेंबर, २००१
३) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१००२/प्र.क्र.५७७/पापु-०७, दिनांक १९ ऑक्टोबर, २००२
४) दिनांक १ ऑगस्ट २००३ रोजी प्रसिध्द केलेला सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.२३
५) शासन निर्णय, पा.पु.व स्व.वि.,क्रमांक ग्रापापु-१००३/प्र.क्र.२५६/पापु-०७, दिनांक १० जुलै, २००६

**शासन निर्णय:**

ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राज्य शासनाने मागणी आधारीत लोकसहभागाचे धोरण स्विकारले असून या धोरणा अंतर्गत योजनेची निवड, आखणी व अंमलबजावणी संबंधीत ग्रामपंचायतीने करावयाची आहे. योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी संबंधीत गावच्या ग्रामसभेमध्ये मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या सुधारीत कलम ४९ नुसार **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती"** गठीत करावयाची आहे. या समितीने ग्रामीण पाणी पुरवठा योजनेची अंमलबजावणी म्हणजे योजनेचे अंदाजपत्रक तयार करुन घेणे, त्यास तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाल्यावर निविदा मागविणे, त्या ग्रामसभेच्या मान्यतेने अंतिम करणे, कंत्राटदाराची नियुक्ती करणे, त्यांच्याकडून योजनेची कामे करुन घेणे, योजनेचे वेगवेगळया टप्प्यावर पर्यवेक्षण करणे, योजनेचे लेखे ठेवणे, इत्यादी कामे करावयाची आहेत. तर योजनेची निवड, नियोजन, अंमलबजावणी करताना सर्वसमावेशकता, पारदर्शकता, लोकसहभाग या तत्वांचा अवलंब करून प्रक्रिया होत आहे काय हे तपासणे, योजनेचे लेखे तपासणे, इत्यादी कामे करणे व त्याबाबतची माहिती ग्रामसभेला उपलब्ध करून देणे ही कामे ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी स्थापावयाच्या ग्राम सामाजिक लेखा परीक्षण समितीने करावयाची आहेत.

२. या समित्यांकडे ग्रामस्तरावरील विकास कामांच्या अंमलबजावणीची जबाबदारी वर नमुद केल्याप्रमाणे सोपविली असल्याने, त्यांना त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी कार्यक्षमतेने पूर्ण करता यावी म्हणून या समित्यांची क्षमता बांधणी करणे आवश्यक आहे. यासाठी राज्यातील सर्व ग्रामपंचायती अंतर्गत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या सुधारीत कलम ४९ नुसार गठीत झालेल्या / होणा-या **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी**

पुरवठा व स्वच्छता समिती" आणि "ग्राम सामाजिक लेखापरीक्षण समिती" या समित्यांमधील सदस्यांचे सक्षमीकरण करण्याचा कार्यक्रम हाती घेण्यास शासन मान्यता देत आहे.

३. हा कार्यक्रम संपूर्ण राज्यामध्ये टप्प्याटप्प्याने राबविण्यात यावा. यासाठी आवश्यक असलेल्या प्रशिक्षकांच्या प्रशिक्षणाचा कार्यक्रम या विभागामार्फत हाती घेण्यात येणार आहे. जिल्हयामधील ग्राम विकास समित्यांचा क्षमता बांधणी कार्यक्रम राज्य शासनाने निवडलेल्या **मुख्य संसाधन केंद्रामध्ये** (Key Resource Centre (KRC)) आयोजित करण्यात येईल. या प्रशिक्षणाबाबतचा दिनांक, वेळ व स्थळ या विभागाकडून व संबंधित मुख्य संसाधन केंद्राकडून संबंधित जिल्हयास आगावू कळविण्यात येईल. जिल्हा परिषदांना असा दिनांक, वेळ व स्थळ प्राप्त झाल्यानंतर संबंधित गट विकास अधिकाऱ्यांमार्फत या प्रशिक्षणासाठी पाठवावयाच्या ग्रामपंचायतींची निवड करावी व ती संबंधित मुख्य संसाधन केंद्राकडे व या विभागास तात्काळ कळवावी. अशी निवड करताना ज्या गावांमध्ये पाणी पुरवठा योजनेचे काम सुरू आहे अथवा पाणी पुरवठा योजनेसाठी गावाची/वाडीची निवड झाली आहे अशा ग्रामपंचायती अंतर्गतच्या ग्राम विकास समित्यांना प्राधान्य देण्यात यावे. या ग्रामपंचायतीच्या संबंधित समित्यांच्या सदस्यांना या प्रशिक्षणासाठी उपस्थित राहण्याच्या सूचनाही संबंधित गट विकास अधिकाऱ्यांनी द्याव्यात व ते उपस्थित राहत आहेत याची खात्री करून घ्यावी.

४. या प्रशिक्षणासाठी निवड केलेल्या प्रत्येक ग्राम पंचायती अंतर्गत गठीत झालेल्या **"ग्राम आरोग्य, पोषण, पाणी पुरवठा व स्वच्छता समिती"** आणि **"ग्राम सामाजिक लेखापरीक्षण समिती"** च्या प्रत्येकी ४ या प्रमाणे ८ सदस्यांना या क्षमता बांधणी कार्यक्रमात सामावून घेऊन त्यांची क्षमता बांधणी करण्यात यावी. या प्रशिक्षणाकरीता सदस्यांची निवड संबंधित गावच्या समित्यांनी करावयाची आहे. अशा प्रकारे ग्रामस्तरावरील क्षमता बांधणी प्रशिक्षण घेतलेल्या सदस्यांनी प्रशिक्षणानंतर समितीच्या इतर सदस्यांना या प्रशिक्षणात घेतलेली माहिती अवगत करून देवून इतर सदस्यांनाही त्यांच्या जबाबदाऱ्या व कार्ये याबाबत अवगत करावे.

५. या कार्यक्रमाचे गट पातळीवरील सनियंत्रण संबंधित गट विकास अधिकारी यांनी, जिल्हा पातळीवरील सनियंत्रण संबंधित जिल्हा परिषदेतील उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद यांनी तर, राज्यस्तरावरील सनियंत्रण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागामार्फत करण्यात यावे.

६. या क्षमता बांधणी प्रशिक्षणासाठी निवड झालेल्या समित्यांच्या सदस्यांचा प्रशिक्षण कालावधीतील दैनिक भत्त्याचा व प्रवास खर्च (गाव ते संबंधित प्रमुख संसाधन संस्था व परत असे सर्वात जवळच्या मार्गाने एस.टी./रेल्वे भाडे) संबंधित मुख्य संसाधन केंद्रामार्फत अदा करण्यात येईल.

७. या क्षमता बांधणी प्रशिक्षण कार्यक्रमासाठी येणारा खर्च राज्याच्या किमान गरजा कार्यक्रमांतर्गत व केंद्र शासनाच्या वर्धित वेग ग्रामीण पाणी पुरवठा/ स्वजलधारा कार्यक्रमांतर्गत क्षमता बांधणीसाठी उपलब्ध असलेल्या निधीमधून भागविण्यात यावा.

८. सदर शासन निर्णय, महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००७०७०२११४०२३००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

संजीव कुमार

(संजीव कुमार) २/७/०७.

सह सचिव, महाराष्ट्र शासन

H-816-1a

प्रति,

१) मा. मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे वरीष्ठ स्वीय सहाय्यक.
४) विभागीय आयुक्त (सर्व)
५) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.
६) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
७) जिल्हाधिकारी (सर्व)
८) प्रकल्प व्यवस्थापक, सुधारणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
९) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१०) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
११) अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१२) गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
१३) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१४) कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१५) उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग,जिल्हा परिषद (सर्व)
१६) उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१७) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१८) अवर सचिव, कार्यासन पापु-०४, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
१९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व नियंत्रण व कार्यासन अधिकारी.
२०) संगणक कक्ष
२१) निवडनस्ती (पापु-०७)

------

H-816-2.